ePaper
“31 डिसेंबरला शिंदे सरकार पडणार म्हणजे पडणारच”:आदित्य ठाकरे

| वर्ष - 7 | अंक - 213 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 11 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत


- वेस्ट इंडिज संघासाठी वाईट बातमी!
- सनाचा बिग बॉसमधला प्रवास संपला
- यावर्षी थंडीचा पॅटर्न वेगळाच!
- एमपीएससी पदभरती शक्यता धूसरच!


# पिंपरी-चिंचवडमध्ये मुख्यमंत्री शिंदे गटाची युवा सेना तैनात!

## » विश्वजीत बारणे यांची जोरदार मोर्चेबांधणी : 272 जणांना नियुक्ती पत्रांचे वाटप

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहर युवा सेनेच्या पदाधिका-यांचा मेळावा (रविवारी, दि. 10) आकुर्डी येथे पार पडला. यावेळी युवा सेनेची नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. तसेच युवा सेनेच्या विविध पदांवरील २७२ पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रांचे या मेळाव्यात वाटप करण्यात आले असल्याची माहिती युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्राचे सचिव विश्वजीत बारणे यांनी दिली. त्यामुळे आगामी महापालिका, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत ‘युवा सेना तैनात’ झाली असून, शिवसेना शिंदे गट जोरदार मुसंडी मारण्यासाठी सज्ज झाला आहे.**



> "मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार लोकोपयोगी निर्णय घेत आहे. शासनाच्या सर्व योजनांचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविला जाणार आहे. शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी युवा सेनेचे कार्यकर्ते कार्य करत आहेत. लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून दिला जात आहे. त्यासाठी विविध योजनांची माहिती पदाधिका-यांना मेळाव्यातून देण्यात आली.
>
> - **विश्वजीत बारणे,** सचिव, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र.

मेळाव्यात युवा सेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, युवासेना सचिव, किरण साळी ,युवासेना सचिव प.महाराष्ट्र ऋतुराज क्षीरसागर आदींनी पदाधिका-यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर पिंपरी-चिंचवड शहर प्रमुख निलेश तरस, राज्य कार्यकारणी सदस्य रुपेश कदम, राज्य कार्यकारणी सदस्या शर्वरी गावंडे, युवा जिल्हा प्रमुख बापू शिंदे, धनंजय पठारे, गणेश सावंत पाटील, विशाल हुलावळे, दत्ता केदारी, प्रशांत जाधव, जिल्हा समन्वयक सागर पाचारणे, अरुण जोगदंड आदी उपस्थित होते. मावळ आणि शिरूर लोकसभा मतदारसंघातील युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांचा हा मेळावा झाला. यामध्ये दोन्ही मतदार संघातील युवा सेनेची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. त्यामध्ये मावळ लोकसभा युवासेना जिल्हाप्रमुख राजेंद्र तरस, युवासेना पिंपरी-चिंचवड शहर प्रमुख माऊली जगताप, युवासेना पिंपरी-चिंचवड शहर संघटक निलेश हाके, उपशहर प्रमुख मकरंद कदम, अभिजित पाटील, चिंचवड विधानसभा प्रमुख मंदार येळवंडे, पिंपरी विधानसभा प्रमुख सागर पुंडे, विद्यापीठ व कॉलेज कक्ष पिंपरी-चिंचवड अध्यक्ष ॲड. संकेत चवरे यांची निवड करण्यात आली. यांच्यासह दोन्ही लोकसभा मतदार संघातील २७२ पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रे देण्यात आली.

### पक्षाचे काम सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा : सरनाईक

**» युवा सेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक म्हणाले की, पूर्वी युवासेनेच्या नियुक्त्या वरच्या पातळीवरून होत असत. त्यामुळे प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पुरेसे बळ मिळत नसे. मात्र आता जे कार्यकर्ते स्थानिक पातळीवर लोकांमध्ये राहून चांगले काम करत आहेत, त्यांना युवा सेनेकडून नियुक्ती दिली जात आहे. पक्ष वाढीसाठी चांगला फायदा होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कामावर विश्वास ठेऊन युवकांनी एकत्र येऊन युवासेना बळकट करावी, असेही ते म्हणाले.**

# औद्योगिक क्षेत्रात सीसीटीव्ही बसवा!

## » डॉ. नीलम गोऱ्हे यांची सूचना : तळवडे येथील आग दुर्घटना स्थळाची पाहणी

। पिंपरी । महाईन्यूज ।

धोकादायक आणि घातक पदार्थांमुळे अपघात होऊ शकतो अशा पदार्थांचा वापर आणि साठा करणाऱ्या पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरातील उद्योग व्यवसायांची तात्काळ माहिती संकलित करा, औद्योगिक क्षेत्रात सीसीटीव्ही यंत्रणा बसवा, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गो-हे यांनी दिले पिंपरी चिंचवड परिसरात तळवडे येथील कारखान्यात झालेल्या दुर्घटना स्थळाची विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पाहणी केली, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार उमा खापरे, पिंपरी चिंचवड महापालिकेचे माजी नगरसेवक केशव घोळवे, शांताराम भालेकर, पंकज



भालेकर यांच्यासह अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, उप आयुक्त मनोज लोणकर, सहायक आयुक्त सीताराम बहुरे, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी ढगे, उपअग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे, औद्योगिक सुरक्षा संचलनालयचे संचालक देवीदास गोरे, सहसंचालक अखिल घोगरे, उपसंचालक योगेश पतंगे, तहसीलदार अर्चना निकम, पोलीस उपआयुक्त डॉ. काकासाहेब डोळे, सहायक आयुक्त पद्माकर घनवट आदी उपस्थित होते.

### जखमींवर ससूनमध्ये उपचार...

» दरम्यान, तळवडे आग दुर्घटनेतील जखमी रूग्णांवर ससून रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने ससून रुग्णालयामध्ये मदत कक्ष सुरु करण्यात आला आहे. यामध्ये वैद्यकीय अधिकारी आणि २ मदतनीस यांची २४X७ नेमणूक करण्यात आली आहे, अशी माहिती आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी दिली.

# पादचारी दिनानिमित्त पीएमपीच्या जादा गाड्या

## दर तीस मिनिटांला गाडी, पीएमपीच्या संचलनात बदल

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पादचारी दिनानिमित्त पीएमपी प्रशासनाकडून सोमवारी जादा गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. दर तीस मिनिटांच्या वारंवारितेने या गाड्या धावणार असून लक्ष्मी रस्त्यावरील गाड्यांच्या संचलनात बदल करण्यात आला आहे. पादचारी दिनानिमित्त लक्ष्मी रस्ता सोमवारी (११ डिसेंबर) वाहनविरहित ठेवण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे.**




सोमवारी सकाळी दहा ते सायंकाळी आठ या कालावधीत लक्ष्मी रस्ता वाहतुकीसाठी आणि पार्किंगसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे नगरकर तालीम चौक ते गरूड गणपती चौकादरम्यान पादचाऱ्यांना विनाअडथळा चालता येणार आहे.

यानिमित्ताने पीएमपीकडून जादा गाड्यांचे नियोजन करण्यात आले असून सकाळी दहा ते सायंकाळी सात या कालावधीत गाड्यांच्या संचलनात बदल करण्यात आला आहे. पादचाऱ्यांच्या सोयीसाठी नगरकर तालीम चौक-बाजीराव रस्ता-महापालिका भवन ते नगरकर तालीम या मार्गावर तीस मिनिटांच्या वारंवारीतेने तर स्वारगेट-उंबऱ्या गणपती चौक-स्वारगेट मार्गावर चाळीस मिनिटांच्या वारंवारीतेने गाड्या सोडण्यात येतील. डेक्कन-उंबऱ्या गणपती चौक-डेक्कन य मार्गावर दर तीस मिनिटांनी जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालय मेट्रो स्थानक येथून येणाऱ्या प्रवाशांसाठी शिवाजीनगर रेल्वे स्थानक ते स्वारगेट या मार्गावरील जिल्हा सत्र न्यायालय मार्गे तर चार मिनिटांच्या वारंवारीतेने संचलनात ठेवण्यात येणार आहेत. पुण्यदशम मार्ग क्रमांक ७ आणि ९ बंद राहणार असून मार्ग क्रमांक ५५, ५८, ५९ शनिपारकडे येताना कुमठेकर रस्ता मार्गे नियमित मार्गाने आणि शनिपारकडून जाताना अप्पा बळवंत चौक, नारायण पेठ, अलका टॉकीज चौकातून नियमित संचलनात राहणार आहेत. मार्ग क्रमांक ८१, १४४, १४४अ, १४४ क आणि २८३ मार्गावरील गाड्या पुणे स्थानकाकडे जाताना नियमित मार्गाने आणि पुणे स्थानकावरून येताना महापालिका भवन मार्गे संचलनात राहणार आहेत.

### दर तीस मिनिटांनी जादा गाड्या

» सोमवारी सकाळी दहा ते सायंकाळी आठ या कालावधीत लक्ष्मी रस्ता वाहतुकीसाठी आणि पार्किंगसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे नगरकर तालीम चौक ते गरूड गणपती चौकादरम्यान पादचाऱ्यांना विनाअडथळा चालता येणार आहे. यानिमित्ताने पीएमपीकडून जादा गाड्यांचे नियोजन करण्यात आले असून सकाळी दहा ते सायंकाळी सात या कालावधीत गाड्यांच्या संचलनात बदल करण्यात आला आहे. पादचाऱ्यांच्या सोयीसाठी नगरकर तालीम चौक-बाजीराव रस्ता-महापालिका भवन ते नगरकर तालीम या मार्गावर तीस मिनिटांच्या वारंवारीतेने तर स्वारगेट-उंबऱ्या गणपती चौक-स्वारगेट मार्गावर चाळीस मिनिटांच्या वारंवारीतेने गाड्या सोडण्यात येतील. गणपती चौक-डेक्कन य मार्गावर दर तीस मिनिटांनी जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत.

# अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनाही आता परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती!

## दरवर्षी 27 विद्यार्थ्यांची निवड, शासनाचा निर्णय

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाची संधी देण्यासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्याची मागणी राज्य शासनाने मान्य केली आहे. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली असून, या योजनेमुळे अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचा परदेशी शिक्षणाचा मार्ग खुला झाला आहे.**



अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी १२० कोटींचा निधी देण्याची घोषणा राज्य शासनाने दोन वर्षांपूर्वी अर्थसंकल्पात केली होती. त्यानुसार आता शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

योजनेअंतर्गत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी क्यूएस जागतिक क्रमवारीमध्ये पहिल्या २०० संस्थांमध्ये स्थान मिळवलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणे बंधनकारक आहे. पदव्युत्तर पदवी, पी.एचडी. अभ्यासक्रमासाठी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. दरवर्षी २७ विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकणार आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी या अभ्यासक्रमांसाठी एकूण १०, औषध आणि जीवशास्त्र, लिबरल आर्ट, मानव्यता या शाखांसाठी प्रत्येकी सहा, कृषिसाठी तीन आणि कायदा, वाणिज्यसाठी दोन अशा एकूण २७ शिष्यवृत्ती देण्यात येणार आहेत. मुस्लिम समाजातील १५, बौद्ध ७, ख्रिश्चन १, जैन १, पारशी १, ज्यू १, शीख १ अशा एकूण २७ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. अल्पसंख्याक समुदायातील एकूण लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रमाणात ही शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाची संधी देण्यासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्याची मागणी राज्य शासनाने मान्य केली आहे. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली असून, या योजनेमुळे अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचा परदेशी शिक्षणाचा मार्ग खुला झाला आहे.

### 120 कोटींचा निधी देण्याची घोषणा

» अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी १२० कोटींचा निधी देण्याची घोषणा राज्य शासनाने दोन वर्षांपूर्वी अर्थसंकल्पात केली होती. त्यानुसार आता शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. योजनेअंतर्गत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी क्यूएस जागतिक क्रमवारीमध्ये पहिल्या २०० संस्थांमध्ये स्थान मिळवलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणे बंधनकारक आहे. पदव्युत्तर पदवी, पी.एचडी. अभ्यासक्रमासाठी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. दरवर्षी २७ विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकणार आहेत.

# युवकांनी ऐकायला शिकावे : डॉ. चंद्रचूड

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

इतरांचे ऐकण्याची शक्ती जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात महत्त्वाची आहे. परंतु आपल्या समाजाची समस्या ही आहे की आपण इतरांचे ऐकत नाही तर आपण फक्त आपलेच ऐकतो. त्यामुळे युवकांनी इतरांचे ऐकायला शिकले पाहीजे, असा मोलाचा सल्ला भारताचे सरन्यायाधीश डॉ.डी.वाय.चंद्रचूड यांनी युवकांना दिला. पुण्यातील सिंबायोसिस इंटरनॅशनल (डीम्ड) विद्यापीठाच्या 20 व्या दीक्षांत समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी सिंबायोसिसचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शां.ब.मुजुमदार, विद्यापीठाच्या प्र-कुलपती डॉ.विद्या येरवडेकर, विद्यापीठाचे प्रो-होस्ट डॉ.राजीव येरवडेकर, कुलगुरू डॉ. रामकृष्णन रमण आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. चंद्रचुड यांनी 28 मिनिटांच्या भाषणात विद्यार्थ्यांनी अपयशाने खचून न जाता त्यातून नविन काहीतरी शिकण्याची उर्मी ठेवण्याचा सल्ला देत विद्यार्थ्यांनी त्यांचे जीवन कसे जगावे याविषयी बहूमुल्य मार्गदर्शन केले.

डॉ. चंद्रचुड म्हणाले, एक न्यायाधीश आजूबाजूच्या वादग्रस्तांच्या त्रासातून सर्वात जास्त शिकतो, एक डॉक्टर सर्वात जास्त सराव करणारा बेडसाइड शिष्टाचार शिकतो, एक पालक आपल्या मुलांच्या तक्रारी ऐकून सर्वात जास्त शिकतो, युवकांनी इतरांचे ऐकण्याचे आणि स्वतःचे इको चेंबर तोडण्याचे धैर्य ठेवणे गरजेचे असल्याचे देखील डॉ. चंद्रचुड यांनी सांगितले. पुण्यातील सिंबायोसिस इंटरनॅशनल (डीम्ड) विद्यापीठाच्या 20 व्या दीक्षांत समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी सिंबायोसिसचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शां.ब.मुजुमदार, विद्यापीठाच्या प्र-कुलपती डॉ.विद्या येरवडेकर, विद्यापीठाचे प्रो-होस्ट डॉ.राजीव येरवडेकर, कुलगुरू डॉ. रामकृष्णन रमण आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. चंद्रचुड यांनी 28 मिनिटांच्या भाषणात विद्यार्थ्यांनी अपयशाने खचून न जाता त्यातून नविन काहीतरी शिकण्याची उर्मी ठेवण्याचा सल्ला देत विद्यार्थ्यांनी त्यांचे जीवन कसे जगावे याविषयी बहूमुल्य मार्गदर्शन केले.

# मालमत्ता सर्वेक्षणाचा क्रांतिकारी निर्णय!

## »कर संकलन विभागाचा पुढाकार : मालमत्ता कर नोंदणी अभियान

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने मालमत्तांचे सर्वेक्षण आणि नवीन मालमत्ता कर नोंदणी अभियान सुरू आहे. या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात मालमत्ता करकक्षेत येण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे हा निर्णय क्रांतीकारी ठरणार असून नागरिकांनी मालमत्ता कर नोंदणी अभियानाला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.**




सध्या महापालिकेत अनेक भांडवली केंद्री प्रकल्प चालू असून भविष्यात याच्या व्यवस्थापनासाठी वाढीव निधी कुठून आणणार असा प्रश्न येत्या दोन तीन वर्षात निर्माण होणार आहे. त्यासाठी आजच पावले उचलली नाही तर पालिकेला आर्थिक अरिष्टाला तोंड द्यावे लागणार हे नक्की आहे. यासाठी उत्पन्नाचे स्थायी स्त्रोत निर्माण करणे हे तातडीचे झाले आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊनच एकंदरीत मालमत्ता कर प्रणालीचा अभ्यास करून आयुक्त शेखर सिंह यांनी सर्वंकष मालमत्ता आकारणीची योजना आखून त्याला मूर्त स्वरूप दिले आहे. योजनेची अंमलबजावणी होऊन फक्त तीनच महिने झाली असून आता त्याची मूर्त स्वरुप दिसू लागले आहे. हे सर्वेक्षण अभियान एकूणच पालिकेची आर्थिक स्थिती अमुलाग्र बदलणार अशी तरी सध्या चिन्हे आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी वर कर संकलन विभागाने 2023-24 या आर्थिक वर्षात आज अखेर 640 कोटींचा कर वसूल केला आहे. यंदा 1 हजार कोटी रुपये उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. मालमत्ता सर्वेक्षण आणि मालमत्ता कर नोंदणी अभियानामुळे आगामी आर्थिक वर्षात मागील करांची थकबाकी आणि चालू मागणी असे मिळून 1500 कोटी रुपये महापालिका तिजोरीत जमा होण्याची शक्यता आहे.

मालमत्ता कर नोंदणी अभियानामुळे आगामी आर्थिक वर्षात महापालिकेची डिमांड दुपट्ट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्या महापालिकेची जी आर्थिक स्थिती आहे, ती पुरेशी सक्षम नाही. या प्रकल्पामुळे महापालिकेची आर्थिक परिस्थिती सक्षम होणार आहे. महापालिकेचा वाढता वेग लक्षात घेता आणि विविध विकास कामांच्या प्रकल्पांना निधी पुरविणे शक्य होणार आहे. यामुळे महापालिका करदात्या नागरिकांना दर्जेदार सेवा-सुविधा पुरविणे शक्य होणार आहे.

**करवाढ नाही, केवळ सर्वेक्षण...**

ज्या मालमत्तांची अंतर्गत मोजणी झाली आहे, त्यामध्ये नोंदणी असलेल्या आणि नोंदणी नसलेल्या मालमत्तांचा समावेश आहे. मात्र, नोंदणी नसलेल्या मालमत्तांची कर आकारणी पहिल्या टप्प्यात होणार आहे. जुन्या मालमत्ता धारकांचे ॲसेसमेन्ट होणार नाही. मालमत्तांना क्रमांक देणे, जीआयएस मॅपिंगव्दारे अंतर्गत मोजणी करून मालमत्तांची सर्व माहिती घेणे हा महापालिकेचा उद्देश आहे. यंदा कोणतीही दरवाढ होणार नाही. मात्र, ज्या मालमत्ता कराच्या कक्षेत नाहीत, त्या कराच्या कक्षेत आणण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

**3 लाख 19 हजार मालमत्तांना नंबर टाकण्याचे काम पूर्ण...**

महापालिकेच्या 18 झोनपैकी 9 झोनमध्ये मालमत्तांना नंबर टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. यामध्ये 6 लाख 19 हजार 197 मालमत्ता पैकी नऊ झोनमधील 3 लाख 19 हजार मालमत्तांना नंबर टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. 2 लाख 2200 मालमत्ता नोंदणीकृत असून 1 लाख 16 हजार 811 नोंदणी नसलेल्या मालमत्ता आढळून आल्या आहेत.



“ आम्ही यंदा कोणतीही करवाढ प्रस्तावित केली नाही. वार्षिक भाडे मुल्यांमध्ये वाढ केली नाही. मात्र, शहरातील ज्या मालमत्तांची नोंदणी झाली नाही त्या कर कक्षेत आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. हा प्रोजेक्ट कोणत्याही परिस्थितीत येत्या 15-18 महिन्यात संपविण्याचा महापालिकेचा मानस आहे. त्यामुळे महापालिकेच्या मालमत्ता करातून मिळणारे उत्पन्न दुप्पट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेची आर्थिक परिस्थिती मजबूत होण्यास मदत होणार आहे.

**-शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक



“ हे सर्वेक्षण महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. यामध्ये सर्व मालमत्तांचे नोंदणी अभियान यामार्फत होणार आहे. यासाठी लागणारी सर्व आवश्यक मदत कर संकलन विभागाला उपलब्ध करून दिली आहे. कर संकलन विभाग हे सर्वेक्षण यशस्वी करेल याची खात्री आहे. मी स्वतः याच्या फॉलो अप घेत आहे.

**-प्रदीप जांभळे-पाटील,** अतिरिक्त आयुक्त



“ सर्व मालमत्ता कर नोंदणी अभियानात आल्यानंतर या मालमत्तांना डिजिटल लॉकर ही सुविधा उपलब्ध करून देणार आहे. त्यामुळे या मालमत्तांची एकूण गुणवत्ता इतर शहरांच्या तुलनेने वाढणार आहे. त्यामुळे या मालमत्ता इतर शहरांपेक्षा अधिक विश्वासार्ह आणि विधिग्राह्य मानल्या जातील. याचा फायदा नागरिकांना होणार आहे. त्याचबरोबर पालिकेची संगणक प्रणाली ही सर्वात युजर फ्रेंडली बनवणार असून नागरिकांना कर भरणे, त्याचा डिस्काउंट घेणे आणि अद्ययावत माहिती मिळणे यासाठी काहीच कष्ट घ्यावे लागणार नाही. कर संकलन कार्यालयात हेलपाटे मारणे हे इतिहासजमा करण्याचे आमचे लक्ष्य आहे.

**-नीलेश देशमुख,** सहाय्यक आयुक्त

---

# शिक्षणाच्या मजबूत पायावर आयुष्याची उभारणी!

## »हभप दिगंबर ढोकले महाराज: निगडीतील शिक्षण प्रसारक मंडळीचा उपक्रम

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संत कृपा झाली इमारत फळा आली। ज्ञानदेव रचिला पाया तुका झालासे कळस।। या ओवी प्रमाणे शिक्षणाच्या मजबूत पायावर आयुष्याची उभारणी होत असते. विद्यार्थ्यांनी आई, वडील, गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली भरपूर अभ्यास करून ज्ञान प्राप्ती करून सद्विचारांचे अनुकरण केले तर जीवन यशस्वी होईल. देशाचे सुजाण, सुसंस्कृत नागरिक म्हणून तुम्ही प्रगती कराल, असे मार्गदर्शन हभप दिगंबर ढोकले महाराज यांनी प्रवचनातून विद्यार्थ्यांना केले.**

शिक्षण प्रसारक मंडळीच्या निगडी शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सुरू असलेल्या उपक्रमातील आणि आळंदी यात्रा कार्तिक भागवत एकादशी निमित्त विद्यार्थ्यांसाठी प्रबोधनपर प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. वारकरी संप्रदाय आणि भागवत संप्रदायाची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी तसेच महाराष्ट्रातील संतांची विचारधारा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी आणि त्यांच्यावर संस्कार घडावे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी हभप किसन महाराज चौधरी, शाळा समिती अध्यक्ष ॲड. दामोदर भंडारी, मुख्याध्यापिका ज्योती बक्षी, लीना वर्तक, उमा घोळे, मुख्याध्यापक रविंद्र मुंगसे, मुख्याध्यापिका सविता बिराजदार उपस्थित होते. शिक्षिका स्नेहल



देशपांडे, रमा जोशी यांनी अभंग गायन केले. इयत्ता चौथीमधील विद्यार्थी सिद्धक शिंदेने तबल्याची साथ दिली. स्वागत सुनील सावंत, शिवाजी बांदल, सूत्रसंचालन प्रीती शेटे आणि दीपा सातपुते यांनी केले. शाळा समिती अध्यक्ष ॲड. दामोदर भंडारी यांच्या संकल्पनेतून तसेच मराठी, इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे मुख्याध्यापिका यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहभागातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### ज्ञानोबा विश्व माऊली....

»विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांच्या पोटी जन्मलेल्या निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई या चार भावंडांना समाजाने वाळीत टाकले. पैठण येथील ब्रम्ह सभेत चराचरात चैतन्य भरलं आहे, प्रत्येक ठिकाणी परमेश्वराचे अस्तित्व आहे; याची जाणीव ज्ञानेश्वर महाराजांनी करून दिली. त्यावेळी ज्ञानोबांनी रेड्या मुखी वेद वदवून घेतला. म्हणूनच भाविक भक्त ज्ञानेश्वरांना ज्ञानोबा माऊली म्हणतात. ज्ञानोबा विश्व माऊली आहेत, असे हभप दिगंबर ढोकले महाराज यांनी सांगितले.



भूमिका

# लोकशाहीचा ढासळता आलेख



**महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अत्यंत विपरीत परिस्थिती ओढवलेली आहे. विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना सामील होणे ही लोकशाहीची फक्त क्रूर थट्टाच नाही तर घोर विटंबनाही आहे. 'आम्ही विकासासाठी एकत्र आलो', असे ते म्हणतात, पण कोणाच्या विकासासाठी ते आपल्याला सगळयांनाच माहीत आहे.**

लोकशाही खिळखिळी झाल्याचा आणि राज्यकारभार गलथान असल्याचा अनुभव आपण रोजच घेतो. तसे होण्याचे मुख्य कारण म्हणजे लोकप्रतिनिधी त्यांना नेमून दिलेली जबाबदारी योग्य रीतीने पार पाडत नाहीत. या गोष्टीचा एक निर्देशक म्हणजे विधिमंडळाच्या बैठका. आपल्या विधिमंडळासंबंधित शासकीय प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे 'सरकार बनवणे, सरकारला योग्य प्रकारे वागायला लावणे, वेळप्रसंगी सरकार बदलणे, सरकारी कामकाजावर देखरेख ठेवणे, त्या कामात गैरप्रकार आढळल्यास त्याबद्दल जाब विचारणे ही विधिमंडळाची कामे आहेत'. त्यांची विभागणी तीन प्रकारांत होते. पहिले काम वैधानिक, म्हणजे विधिनियम किंवा कायदे करणे. दुसरे आर्थिक, म्हणजे कल्याणकारी पद्धतीने राज्याच्या अर्थव्यवहाराचे सर्वांगीण नियोजन व अंमलबजावणी करणे. तिसरे टीकात्मक, म्हणजे शासनयंत्रणेवर अंकुश ठेवणे. विधानसभा व विधान परिषद मिळून विधिमंडळ बनते हे सर्वांना माहीत आहे. विधिमंडळाच्या दर वर्षी होणाऱ्या अधिवेशनांमधून आपली प्रातिनिधिक लोकशाही आविष्कृत होत असते. महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या कामकाजाची माहिती शासनाच्या HTTP://WWW.MLS.ORG.IN या संकेतस्थळावरून मिळते. या संकेतस्थळावर 'विधानसभा मार्गदर्शिका' नावाचा दस्तावेज उपलब्ध आहे. त्यातील परिशिष्ट १४ मध्ये १९६१ पासून २०२१ पर्यंतच्या विधानसभा बैठकांची माहिती दिलेली आहे (पृष्ठे ५४०-५४७). या बैठकांचा आलेख पुढीलप्रमाणे. आता एक साधा प्रश्न मनात येतो, की हा आलेख खरं तर उंच जायला नको का? राज्यस्थापनेच्या पहिल्या दशकात जर वर्षाला ७०-८० बैठका होत होत्या तर सध्या हा आकडा दुप्पट-तिप्पट व्हायला पाहिजे! तेव्हा तर दळणवळणाची परिस्थिती अवघड होती. अनेक आमदार एसटीच्या लाल डब्यातून मुंबईला पोहोचत. आता परिस्थिती केवढी बदलली आहे. मोठमोठे महामार्ग झालेले आहेत. आमदारांकडे आलिशान वाहने आहेत. त्यांना विमानाची कुपन्स मिळतात. काहींच्या दिमतीला तर उद्योगपतींची हेलिकॉप्टर्स असतात. शिवाय मुंबई आणि नागपूर येथे अधिवेशनाच्या काळात उत्तम बडदास्त ठेवली जाते. असे असताना बैठकांची संख्या कमी कमी का होते? बरं, राज्यापुढची आव्हाने आणि समस्या कमी झाल्यात का? असं झालंय का की लोकप्रतिनिधींना काही कामच उरलेलं नाही? तसं तर अजिबात नाही. शेतीची ससेहोलपट सगळय़ांना दिसते. निम्मा महाराष्ट्र दुष्काळाने होरपळतो. शिक्षणाचा आणि आरोग्याचा विचका झाला आहे. जलसिंचनाचा बोजवारा. तरुणांना रोजगार नाही. शहरे बकाल आणि प्रदूषित. गुन्हेगारी वाढलेली. हवामानबदलाचे संकट. सगळय़ा वातावरणात गोंगाट आणि कल्लोळ! समस्या तर डोंगराएवढय़ा आहेत. विधिमंडळाचे कार्य बघावे तर अनेक कायदे व्हायला पाहिजेत. असलेल्या कायद्यांमध्ये दुरुस्त्या व्हायला हव्या; नियम बनायला हवेत. एकच उदाहरण घ्यायचे तर करोना साथीचे नियमन करण्यासाठी आपल्याला ब्रिटिश काळात, १८९७ साली केलेल्या साथनियंत्रण कायद्याचा आधार घ्यावा लागला. म्हणजे मधल्या सव्वाशे वर्षांच्या काळात आपण याबाबतीत काहीच बुद्धी चालवली नाही! कायदे, विशेषत: त्यांचे नियम करण्याचे काम प्रचंड तर आहेच शिवाय रोजच वाढणारे आहे. आणि शासनयंत्रणेवरची देखरेख? ती कोण करणार? या प्रश्नाची दुसरी बाजू अशी आहे की बैठकांची संख्या कमी होत असली तरी अधिवेशनांचा खर्च मात्र कोटीच्या कोटी उड्डाणे करत असतो. या संदर्भातली अधिकृत आकडेवारी सहज उपलब्ध होत नाही परंतु वर्तमानपत्रांतील वृत्तांवरून असे दिसते की अधिवेशनाचा प्रत्येक दिवसाचा खर्च हा दहा-बारा कोटी रुपयांहून जास्त असतो. हा एवढा खर्च का होतो हे एक गौडबंगाल आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे या खर्चाची मागणी होत असल्यामुळे स्वच्छता, रंगरंगोटी, वाहतूक या गोष्टींसाठी तो बव्हंशी होत असतो.

## संपादकीय »

### अमृतकालाच्या दिशेने

***भारतीय शेअर बाजाराचा निर्देशांक वाढल्याने प्रथमच सुचीबद्ध कंपन्यांचे बाजारमूल्य 333 लाख कोटी किंवा 4 ट्रिलियन डॉलर्स झाले आहे.***

सध्या अमेरिका, चीन, जपान आणि हाँगकाँगनंतर 4 ड्रिलियनपेक्षा अधिक बाजारमूल्य असणाऱ्या भांडवल बाजारात भारतीय शेअर बाजार समाविष्ट झाला, हा टप्पा महत्त्वाचा ठरतो. एक वर्षाच्या कालावधीत सेन्सेक्स 9.10 टक्के परतावा दिला असून त्यात गुंतवणूक असणाऱ्यांचा 50.81 लाख कोटींचा फायदा झाला आहे. शेअर बाजाराची ही झळाळी एका बाजूला असतानाच राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ ही 3 महिन्यांच्या कालावधीत 6.7 टक्के अंदाजीत होती, ती 7.6 टक्के अशी झाली आहे. त्यामुळे अर्थचित्र रंगतदार झाले आहे. मॉर्गन स्टॅन्ले भांडवल बाजार निर्देशांकामध्ये भारताचे महत्त्व 0.4 टक्क्याने वाढले, ही बाबसुद्धा महत्त्वाची ठरते. शेअर बाजारातील घसघशीत वाढ ही प्रामुख्याने अमेरिकेने व्याजदरात 5.25 टक्के इतकी प्रचंड वाढ केल्याने निर्माण झाली. हा धक्का सहन करीत गुंतवणूक चालना देणे, हे कठीण काम भारतीय अर्थव्यवस्थेने केले आहे.

**चुणचुणीत कवनचा शाळेत दुसरातिसरा नंबर असे. तो उत्तम चित्रं काढी; पोवाडे गाई; वक्तृत्व स्पर्धाही गाजवी. मित्रांचा लाडका होता. कॉलेजात गेल्यावर त्याचा उत्साह घटला. अधूनमधून त्याचा अभ्यास, गाणं, चित्रकला सगळयातला रस जाई; कुठलंही काम एकाग्रतेने जमेनासं होई; उगाचच रडू येई.**

# आरोग्याचे डोही : फिंटो अंधाराचे जाळे

रात्रीची झोप लागत नसे; दिवसा थकवा येई; भूक जाई; कुठलीही हालचाल करणं त्याच्या जिवावर येई. तीन-चार आठवडय़ांचा तसा कमालीचा निरुत्साही काळ गेला की तो जरा ताळयावर येई; अभ्यासाला लागे; त्याला परीक्षा जेमतेम झेपत. हळूहळू तो एकलकोंडा होत गेला; पंचविशी उलटली तरी लग्नाला तयार होईना. सतत कुठल्याशा जुन्या-दु:खद आठवणी उगाळून, "मी कमनशिबी आहे; प्रत्येक वेळी घोडचूक करून हातची संधी घालवली. माझं जगणं निरर्थक आहे," म्हणू लागला. त्याचे मित्र तुटले. नातेवाईकही वैतागून त्याच्यापासून दूरच रहू लागले. रात्री तीन वाजता त्याची झोप उडे; जेवणखाण अगदी कमी झालं; वजन घटत चाललं. अलीकडे तो, "हे निरर्थक जिणं संपवतोच," म्हणू लागला; त्याचे दादा- वहिनी घाबरले; त्याला डॉक्टरांकडे घेऊन गेले.



प्रत्येकालाच कधी ना कधी उदास वाटतं. घटस्फोट; जिवलगाचा मृत्यू, अपयश, अपघाताने आलेलं अपंगत्व वगैरे उघड कारणांमुळे येणारं नैराश्य ही तात्पुरती प्रतिक्रिया असते. ती काही महिन्यांनी आपल्या आपण ओसरते. ती त्याहून अधिक रेंगाळली तरच तिच्यावर उपचार करावे लागतात. पण कवनचा त्रास कारणाशिवाय, अंतर्मनातून उद्भवलेला, अधिक गंभीर, व्यापक होता. त्याला कॉलेजपासूनच अंतर्जात नैराश्याचा 'आजार' होता. खोकला- ताप- सांधेदुखी वगैरे 'राजमान्य' आजारांवर ताबडतोब उपचार केले जातात. नैराश्याचा त्रास सुरू झाल्यापासून तो आजार असल्याचं मान्य होईपर्यंत सरासरी पाच वर्ष वाया जातात. त्यानंतर सामाजिक बाऊमुळे मनोविकारतज्ज्ञाकडे जाण्यात आणखी दिरंगाई होते. समाजात मनोविकार लांच्छनास्पद मानले जातात. नैराश्याच्या रुग्णांत प्रचंड न्यूनगंड असतो. ते आपलं नैराश्य सांधेदुखी, डोकेदुखी, अपचन वगैरे शारीरिक व्याधींत लपवतात. त्या छुप्या नैराश्यावर उपचार करायला अनुभवी, जाणते, मनकवडे फॅमिली डॉक्टर लागतात. मग वेळोवेळी मनोविकारतज्ज्ञांच्या सल्ल्याचीही जोड मिळते. शाळकरी नैराश्याची लक्षणंच दिशाभूल करणारी असतात. आठवीतल्या किंजलला विनाकारण अपराधी वाटत होतं. उगाचच भांडून, खोटया बढाया मारून तो शिक्षा ओढवून घेई. 'अभ्यासात लक्ष नाही; बकाबका खातो; दिवसभर झोपतो,' म्हणून आईवडलांचा मार खाई. फॅमिली-डॉक्टरांनी नैराश्याचं नेमकं निदान केलं. पण 'आमच्या मुलाला मानसिक आजार होणं शक्यच नाही!' ही अजाण आईवडलांची शहामृगी वृत्ती उपचारांच्या आड आली. किंजल एकटा पडला. त्या मानसिक एकटेपणाचं पर्यवसान आत्मघातात झालं. नैराश्यग्रस्तांच्या आत्महत्येचा निर्णय अंतर्जात असतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सहकार कायद्यातील सुधारणा मागे!

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधामुळे सरकारचा निर्णय

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सहकारी संस्थांच्या कारभारात राजकीय हस्तक्षेप करून विरोधकांची कोंडी करण्यासाठी सहकार कायद्यात केलेल्या सुधारणा मागे घेण्याची नामुष्की सरकारवर ओढवली. सहकारी संस्थांमध्ये 'क्रियाशील' आणि 'अक्रियाशील' अशी सभासदांची वर्गवारी करीत 'अक्रियाशील' सभासदांना निवडणूक लढविण्यास मनाई करणारे विधेयक सरकारने हिवाळी अधिवेशनात मागे घेतले आहे.**

दोन्ही काँग्रेसची सहकारातील मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी शिंदे-फडणवीस सरकारने ३० मे रोजी सहकार कायद्यात सुधारणा करीत सहकारी संस्थांमधील सभासदांची क्रियाशील आणि अक्रियाशील अशी वर्गवारी करण्याचा निर्णय घेतला होता. जे सभासद पाच वर्षांत संस्थेच्या एकाही सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणार नाहीत, तसेच संस्थेच्या सेवांचा वापर करणार नाहीत अशा अक्रियाशील सभासदांना संस्थेच्या निवडणुकीत मतदान करण्यास तसेच निवडणूक लढविण्यास प्रतिबंध करण्यात आला होता. तसेच अक्रियाशील सभासदांस संस्थेचा पदनिर्देशित अधिकारी म्हणून निवडून येण्यास किंवा स्वीकृत अथवा नामनिर्देशीत सदस्य म्हणून संस्थेवर येण्यासही प्रतिबंध करण्यात आला होता. या निर्णयाचा आधार घेत सरकारने विरोधकांच्या ताब्यातील काही



साखर कारखाने, सूतगिरण्या आणि अन्य सहकारी संस्थांच्या निवडणुकीत ऐनवेळी उमेदवार तसेच मतदारांना अपात्र ठरवून विरोधकांना मोठा धक्का दिला होता. तसेच या निर्णयाचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात याबाबतचे विधेयक विधानसभेत मांडण्यात आले होते. मात्र या निर्णयाला सहकार सहकार क्षेत्रातून जोरदार विरोध झाला होता.

विरोधकांची कोंडी करण्यासाठी त्यांचे दूध किंवा कारखान्यात ऊस घेण्यास नकार आदी मार्गाचा अवलंब करून सभासदांना आणि पर्यायाने निवडणूक लढवू पाहणाऱ्या सभासदांना अक्रियाशील ठरविले जात होते. तसेच दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळेही सभासद संस्थेच्या सेवांचा वापर करू शकले नाहीत तरी ते अपात्र ठरण्याचा धोका होता. याच दरम्यान राज्यात झालेल्या राजकीय घडामोडींनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीचा एक गट महायुती सरकारमध्ये सहभागी झाला. अजित पवार यांच्या गटातील अनेक नेत्यांच्या साखर कारखान्यांसाठी सहकार कायद्यातील ही सुधारणा अडचणीची ठरली होती. त्यामुळे पवार गटाने या नव्या तरतूदींना विरोध केल्याने पावसाळी अधिवेशनात हे विधेयक संमत होऊ शकले नव्हते. अधिवेशनांनतर पवार गटाच्या आग्रहाखातर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि फडणवीस यांना आपल्या महत्वकांक्षेला मुरड घालावी लागली. त्यानुसार मंत्रिमंडळाच्या बैठकीत क्रियाशील आणि अक्रियाशील सभासद आणि त्यासंदर्भातील सुधारणा मागे घेण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी घेण्यात आला होता. त्यानुसार विधिमंडळात प्रलंबित असलेले विधेयक सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी विधानसभेत मागे घेतले. त्यामुळे सहकारी संस्थांच्या सभासदांना आता निवडणूक लढविण्याची आणि मतदानाची मुभा मिळाली आहे.

### काय घडले?

» सत्तेत सहभागी असलेल्या अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीच्या गटाने सहकार कायद्यातील सुधारणांना विरोध केला होता. परिणामी, पावसाळी अधिवेशनात हे विधेयक संमत होऊ शकले नाही. राष्ट्रवादीच्या विरोधामुळे मंत्रिमंडळाच्या बैठकीत क्रियाशील आणि अक्रियाशील सभासद आणि त्यासंदर्भातील सुधारणा मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर शुक्रवारी विधानसभेत हे विधेयक मागे घेण्यात आले.

# एमपीएससी पदभरती शक्यता धूसरच!

## अंमलबजावणी लोकसभा निवडणुकीनंतरच?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शासकीय सेवेत 'गट-क'ची पदे 'एमपीएससी'मार्फत भरण्याचा निर्णय वर्षभरापूर्वी झाला आहे. मात्र प्रशासकीय पातळीवर हालचाली होत नसल्याने याची अंमलबजावणी लांबली आहे. प्रक्रिया सुरू होण्यास अद्याप सहा महिने लागणार असल्यामुळे आता लोकसभा निवडणुकीपूर्वी अंमलबजावणी शक्य नसल्याचे चित्र आहे.**




> राज्यात अनेक विभाग असल्याने त्यांच्या सेवा नियमात सुधारणा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पुढील सहा महिन्यांत ती प्रक्रिया पूर्ण होईल. सध्या लिपिक टंकलेखक पदांची भरती 'एमपीएससी'मार्फत सुरू आहे. उर्वरित पदेही टप्प्याटप्प्याने 'एमपीएससी'मार्फत भरली जातील.
>
> – **नितीन गद्रे,** अतिरिक्त मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग

विविध खात्यांतील वर्ग दोन व तीनची पदे पूर्वी 'महापरीक्षा पोर्टल'मार्फत भरली जात होती. परंतु, तोतया उमेदवार, गुणांमध्ये फेरफार अशा प्रकारांमुळे पोर्टल बंद करून 'महाआयटी'तर्फे कंपन्यांना काम देण्यात येऊ लागले. त्यालाही विरोध झाला व 'एमपीएससी'मार्फत परीक्षा घेण्याची मागणी झाली. त्यामुळे सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्याचा निर्णय २ नोव्हेंबर २०२२ रोजी घेण्यात आला. लिपिक-टंकलेखक पदे वगळून उर्वरित पदे 'एमपीएससी'च्या कक्षेत आणण्यासाठी केरळ लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर नियमात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतरही शासनाने ७५ हजार पदांच्या भरतीसाठी टीसीएस आणि आयबीपीएस या कंपन्यांना कंत्राट दिले. अनेक विभागांच्या परीक्षा या दोन कंपन्यांकडून सुरू असून यात गैरप्रकाराचे आरोप झाले असतानाही 'एमपीएससी'कडून भरतीप्रक्रियेची प्रशासकीय पातळीवर अंमलबजावणी झालेली नाही. सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्यास आणखी सहा महिने लागणार असल्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव नितीन गद्रे यांनी दिली. मात्र साधारणत: त्याच काळात लोकसभा व पाठोपाठ विधानसभा निवडणूक असेल. त्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी आणखी लांबणीवर पडण्याची शक्यता असल्याने उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली आहे. राज्यात सरळसेवा भरती घेणाऱ्या 'टीसीएस' आणि 'आयबीपीएस' या कंपन्यांवर विद्यार्थ्यांचा विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे सेवा प्रवेश नियमात लवकर सुधारणा करून सर्व भरती परीक्षा 'एमपीएसी'च्या कक्षेत आणाव्यात, अशी मागणी स्टुडंट्स राइट असोसिएशनच्या महेश बडे यांनी केली. खासगी कंपन्यांमार्फत घेण्यात येणाऱ्या भरती परीक्षांमध्ये पेपरफुटी, तोतया उमेदवार बसवणे, केंद्रावर कॉपी पुरवणे असे विविध गैरप्रकार समोर आले आहेत. कंपन्यांचे स्वत:चे परीक्षा केंद्र नसल्यामुळे हा गोंधळ होत असल्याचे सांगितले जाते. मात्र त्यामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांवर अन्याय होतो.

# ३१ डिसेंबरला सरकार पडणार म्हणजे पडणारच

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांनी स्वत:च्या खोक्यांची एफडी नक्कीच वाढवली असेल. पण, हा थोड्या दिवसांचा खेळ आहे. ३१ डिसेंबरला शिंदे सरकार पडणार म्हणजे पडणार, अशी टीका शिवसेना ( ठाकरे गट ) आमदार आदित्य ठाकरे यांनी केली होती. याला मंत्री, भाजपा नेते राधाकृष्ण विखे-पाटील यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, "आदित्य ठाकरेंना सरकार गेल्याचं वैफल्य आहे. दुसरं आपला स्वत:चा पक्ष सांभाळू शकले नाहीत, त्याचंही वैफल्य आहे. या वैफल्यामुळे आदित्य ठाकरेंची बुद्धी भ्रष्ट झाली आहे. इंदापुरात भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर चप्पलफेक करण्यात आली होती. यावर बोलताना विखे-पाटलांनी म्हटलं, "प्रत्येकाला आपलं मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. पण, असे प्रकार घडत गेले, तर सद्यस्थितीत गंभीर प्रश्न निर्माण होतील. काही लोकांच्या भावना होत्या. त्यामुळे ती स्वाभाविक प्रतिक्रिया होती. पण, आता हा प्रश्न संपला आहे. भविष्यात अशा घटना होऊ नये, याची दक्षता घेतली पाहिजे. 'नबाव मलिकांवर कारवाई करण्यात येते. पण, प्रफुल्ल पटेलांवर कुठलीही कारवाई होत नाही. पटेलांनी अजित पवारांना भाजपाबरोबर एकत्रित आणण्यासाठी प्रयत्न केल्यानं त्यांच्यावर कारवाई होत नाही का?' असा सवाल राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवारांनी उपस्थित केला होता. याबद्दल प्रश्न विचारल्यावर विखे-पाटील म्हणाले, "रोहित पवार केव्हापासून राज्याचे नेते झाले आहेत? की त्यांच्या प्रतिक्रियेवर आम्ही भाष्य करावे.घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांनी स्वत:च्या खोक्यांची एफडी नक्कीच वाढवली असेल. पण, हा थोड्या दिवसांचा खेळ आहे. ३१ डिसेंबरला शिंदे सरकार पडणार म्हणजे पडणार, अशी टीका शिवसेना आदित्य ठाकरे यांनी केली होती. याला मंत्री,त विखे-पाटील यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले.

# इंडिया आघाडीची 19 डिसेंबरला बैठक

## काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांची माहिती

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंडिया आघाडीची चौथी बैठक १९ डिसेंबर रोजी दिल्लीत होईल, अशी माहिती काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी दिली आहे. इंडिया आघाडीची चौथी बैठक पुढे ढकलण्यात आली होती. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांच्यासह आघाडीतील प्रमुख नेत्यांनी निर्णय घेतल्यानंतर ही बैठक 17 डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली होती. इंडिया आघाडीची चौथी बैठक १९ डिसेंबर रोजी दिल्लीत दुपारी तीन वाजता होईल, अशी माहिती काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी दिली आहे.**




मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि राजस्थानचे निवडणूक निकाल जाहीर झाल्याच्या दिवशी काँग्रेसने ६ डिसेंबरला बैठक बोलावली होती. कार्य व्यस्ततेमुळे या बैठकीला उपस्थित राहता येणार नाही, असे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी स्पष्ट केले होते. यानंतर इंडिया आघाडीची बैठक लांबणीवर पडली होती. सध्या इंडिया आघाडीमध्ये बरेच वाद सुरु असल्याचं चित्र आहे. त्यामुळे विरोधकांच्या या युतीमध्ये सध्या बराच तणाव आल्याच पाहायला मिळत आहे.

त्याचवेळी काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी ही पोस्ट केली आहे. त्यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं की, भारत आघाडीत सामील असलेल्या पक्षांच्या नेत्यांची चौथी बैठक मंगळवार, 19 डिसेंबर 2023 रोजी नवी दिल्ली येथे दुपारी 3 वाजल्यापासून होणार आहे. या बैठकीत जागावाटपावर चर्चा होण्याची शक्यता आहे.

### इंडिया आघाडीची चौथी बैठक

» इंडिया आघाडीची चौथी बैठक १९ डिसेंबर रोजी दिल्लीत होईल, अशी माहिती काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी दिली आहे. इंडिया आघाडीची चौथी बैठक पुढे ढकलण्यात आली होती. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांच्यासह आघाडीतील प्रमुख नेत्यांनी निर्णय घेतल्यानंतर ही बैठक 17 डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली होती.

याशिवाय 2024 च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी संयुक्त निवडणूक प्रचाराबाबतही बैठकीत चर्चा होऊ शकते. पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, या बैठकीत विरोधी गटाच्या ऐक्याचा विषय 'नॉट आय, वी' असेल. यापूर्वी ही बैठक 6 डिसेंबरला होणार होती. या बैठकीत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी पूर्वनिर्धारित तारखेला बैठकीला उपस्थित राहणार नसल्याची माहिती दिली होती. तमिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन म्हणाले की ते राज्यात चक्रीवादळ मिचॉन्गचे व्यवस्थापन करत आहेत. त्याचवेळी ममता बॅनर्जी यांच्या कुटुंबात लग्न होते, तर नितीश कुमार यांनी प्रकृतीचे कारण देत बैठकीला येण्यास नकार दिला होता. 27 पक्षांच्या आघाडीची शेवटची बैठक सप्टेंबरमध्ये मुंबईत झाली होती, ज्यामध्ये समन्वय समित्यांची स्थापना करण्यात आली होती. या बैठकीचे आयोजन उद्धव ठाकरे यांनी केले होते.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की आघाडीत सामील असलेल्या पक्षांमधील जागावाटपाची चर्चा रखडली होती, राज्यांमध्ये चांगले निकाल अपेक्षित होते ज्यामुळे त्यांच्या चर्चेला आणखी जोर येणार होता. इंडिया आघाडीची चौथी बैठक १९ डिसेंबर रोजी दिल्लीत होईल, अशी माहिती काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी दिली आहे. इंडिया आघाडीची चौथी बैठक पुढे ढकलण्यात आली होती. इंडिया आघाडीची चौथी बैठक १९ डिसेंबर रोजी दिल्लीत दुपारी तीन वाजता होईल, अशी माहिती काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी दिली आहे.

# यावर्षी थंडीचा पॅटर्न वेगळाच!

## दिवसा थंडी पहाटे कमी : माणिकराव खुळे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सध्या देशातील हवामानात (WEATHER) सातत्यानं बदल होत आहे. कुठं थंडी आहे तर कुठं ढगाळ वातावरण आहे, तर काही भागात अवकाळी पाऊस (RAIN) पडत आहे. दरम्यान, 2023 च्या एल-निनो वर्षात दर वर्षासारखी थंडी नाही. यावर्षी ती कशी वळण घेऊ शकते, हे बघणेही गमतीशीर आहे.**



8 डिसेंबरपासून डिसेंबर महिन्याच्या थंडीला जरी सुरुवात झाली असली तरी, सध्याचा थंडीचा पॅटर्न जरा वेगळाच जाणवत असल्याची माहिती ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली. सध्या दिवसा थंडी वाजत असून, त्यामानाने पहाटेचा गारवा कमीच असल्याची माहिती खुळे यांनी दिली. सध्याच्या हवामानाबाबत माणिकराव खुळे यांनी सविस्तर माहिती दिली आहे. विदर्भ वगळता, कोकणासहित उर्वरित महाराष्ट्रात सध्या दुपारचे कमाल तापमान हे 27 डिग्री से. ग्रेडच्या तर विदर्भात 25 डिग्री से. ग्रेडच्या दरम्यान जाणवत आहे. म्हणजेच दरवर्षीच्या सरासरी तापमानापेक्षा विदर्भात जवळपास 4 डिग्री से. ग्रेडने तर कोकणासहित उर्वरित महाराष्ट्रात 2 डिग्री से. ग्रेडने कमी आहे.

दुपारच्या तापमानातील ही ठळक व स्पष्ट जाणवणारी मोठी गिरावट आहे. त्यामुळं दिवसा चांगलीच थंडी तर वाजतेच आहे. निरभ्र आकाशामुळे सूर्यप्रकाशाला अडथळा नाही. सूर्यप्रकाश भरपूर असला, तरीदेखील ह्या दिवसात दिवसाची लांबीही कमी असते. म्हणूनच खालावलेल्या कमाल तापमानामुळं दैनिक सापेक्ष आर्द्रताही सरासरीपेक्षा खुप आणि खुपच घसरलेली आहे. त्यामुळेच साहजिकच सध्या दमटपणा कमी जाणवत आहे. हवेत कोरडेपणा वाढला आहे. म्हणून तर सध्या पहाटेच्या किमान तापमानातही वाढ होऊनही सकाळी थंडी जाणवतच आहे. खरतर डिसेंबर हा अति थंडीचा महिना मानला जातो. थंडीच्या तीव्रता मोजण्याचा (म्हणजे थंडी कमी किंवा जास्त ) हा ' किमान तापमान किती आहे?' हेच ठरवते. म्हणजे थंडी तीव्रता ठरवण्याचा निर्देशक घातांक किमान तापमानच आहे. सध्याचे किमान तापमान हे सरासरी इतके किंवा त्यापेक्षा कमी असावयास हवे.

# छत्तीसगडचे मुख्यमंत्री सोने, चांदीचे शौकीन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

छत्तीसगड विधानसभा निवडणुकीत (CHHATTISGARH ASSEMBLY ELECTIONS) भारतीय जनता पक्षाने (भाजप) दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयानंतर राज्याची सूत्रे कोणाकडे सोपवायची यावरुन गेल्या अनेक दिवसांपासून खलबत सुरु होती. पण अखेर भाजपने अखेर छत्तीसगडच्या मुख्यमंत्रीपदाची माळ राज्याचे आदिवासी नेते विष्णुदेव साई (VISHNU DEO SAI) यांच्याकडे सोपवली आहे. तुम्हाला माहित आहे का की विष्णुदेव साई हे करोडोंच्या संपत्तीचे मालक आहेत. ते सोने, चांदी आणि हिऱ्याचे शौकीन आहेत.

छत्तीसगडच्या कुंकुरी मतदारसंघातून निवडणूक जिंकलेले विष्णुदेव साई हे भाजपचे प्रदेशाध्यक्षही राहिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM MODI) यांच्या पहिल्या कार्यकाळात ते पोलाद, खाण, कामगार आणि रोजगार राज्यमंत्री राहिले आहेत. छत्तीसगडचे नवे मुख्यमंत्री हे विष्णुदेव साई हे व्यवसायाने शेतकरी आहेत. निवडणूक प्रतिज्ञापत्रात त्यांनी आपले उत्पन्न 10.11 लाख रुपये, तर पत्नीचे उत्पन्न 3.81 लाख रुपये असल्याची माहिती दिली आहे. विष्णुदेव साई यांनी त्यांची एकूण संपत्ती 3.80 कोटी रुपये असल्याचे जाहीर केले आहे. त्याच्या संपत्तीमध्ये काय समाविष्ट आहे ते जाणून घेऊया. विष्णुदेव साई आणि त्यांच्या कुटुंबाकडे एकूण 8 लाखांची रोकड आहे.

# रश्मिकाला घातली लग्नाची मागणी!

रश्मिका मंदाना सध्या 'ॲनिमल' सिनेमामुळे चांगलीच चर्चेत आहे. 'ॲनिमल'मधील रश्मिकाच्या भूमिकेने प्रेक्षकांची चांगली पसंती मिळवली आहे. 'ॲनिमल'मध्ये रश्मिका - रणबीरच्या जोडीला लोकांनी डोक्यावर घेतलंय. अशातच महाराष्ट्रातल्या एका तरुणाने रश्मिकाला थेट लग्नाची मागणी घातली असल्याचा रंजक किस्सा समोर आलाय. अमिताभ बच्चन यांच्या KBC 15 च्या मंचावर या गोष्टीचा उलगडा झाला. काय घडलंय? KBC 15 मध्ये हॉटसीटवर बसण्याचा मान महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील प्रमोद भास्केला मिळाला. खेळादरम्यान प्रमोदने बिग बींना सांगितले की, त्याला चित्रपट पाहणे आवडते आणि तो रश्मिका मंदान्नाचा खूप मोठा चाहता आहे. प्रमोदने असेही सांगितले की, रश्मिकाने 2016 मध्ये कन्नड चित्रपट 'किरिक पार्टी'द्वारे डेब्यू केला होता. एवढेच नाही तर रश्मिकाने सोशल मीडियावर त्याला तीनदा रिप्लाय दिल्याचेही त्याने सांगितले. स्पर्धकाने सांगितले की तो रश्मिकाचा सर्वात मोठा चाहता आहे आणि त्याच्यापेक्षा मोठा चाहता कोणीही असू शकत नाही. प्रमोदने रश्मिकाला लग्नाचा प्रस्ताव पाठवल्याचे सांगितले तेव्हा ते ऐकून बिग बी आश्चर्यचकित झाले आणि तिनेही त्याला प्रतिसाद दिला. हे ऐकून बिग बींनी "रश्मिकाशी बोलण्याची संधी कधी मिळाली का?" असे विचारले. यावर प्रमोद म्हणाला की, "ती सध्या ॲनिमलच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे".



# तृप्ती डिमरी ही रातोरात स्टार बनली!



रणबीर कपूरचा 'ॲनिमल' चित्रपट पहिल्याच दिवसापासून बॉक्स ऑफिसवर चांगलीच कमाई करत आहे आणि दुसऱ्या आठवड्यातही या चित्रपटाचे यश कायम आहे. या चित्रपटामुळे बरेच वाद सुरु आहेत .तर चित्रपटात झोयाची भूमिका साकारणारी तृप्ती डिमरी ही रातोरात स्टार बनली आहे. आता तृप्ती डिमरीला नॅशनल क्रश म्हटलं जात आहे. तृप्तीच्या लोकप्रियतेत खुप वाढ झाली आहे. या चित्रपटात तिने रणबीरसोबत बरेच इंटिमेट सीन्स दिले आहे. या इंटिमेट सीन्सचीही सध्या चर्चा आहे. यापुर्वी तृप्तीने ते सीन कसे शुट झाले होते आणि दिग्दर्शक संदिप रेड्डी आणि रणबीरने ती परिस्थिती कशी हाताळली हे सांगितले होते. आता तिच्या या इंटिमेट सीनवर तृप्तीच्या पालकांनी कशी प्रतिक्रिया होती हे तिने सांगितले आहे. बॉलिवूड हंगामासोबतच्या झालेल्या संवादात तृप्तीने याबाबत खुलासा केला. रणबीर कपूरसोबतचे ते इंटिमेट सीन पाहून तिच्या पालकांना धक्का बसल्याचे तिने सांगितले. ते म्हणाले, 'आम्ही चित्रपटांमध्ये असं काही यापुर्वी पाहिलं नाही आणि तू ते केलं.' त्या सीनमधून सावरायला त्यांना थोडा वेळ लागला. ते पुढे म्हणाला, 'तू हे करायला नको होतं, पण ठीक आहे. पालक या नात्याने आम्हाला असं वाटणं सहाजिक आहे. पुढे ती म्हणाली, 'मी त्यांना सांगितले की मी काहीही चुकीचे केले नाही. हे माझे काम आहे आणि जोपर्यंत मी सुरक्षित आहे तोपर्यंत मला ते करण्यात काहीही अडचण वाटत नाही. मी एक अभिनेत्री आहे आणि मी साकारलेल्या व्यक्तिरेखेशी 100 टक्के प्रामाणिक असलं पाहिजे आणि मी ते केले' 29 वर्षीय तृप्ती डिमरीने 'लैला मजनू' या चित्रपटातून आपल्या करिअरची सुरुवात केली होती.

# सनाचा बिग बॉसमधला प्रवास संपला

बिग बॉस 17 च्या घरातून सना रईस खानला एलिमिनेट व्हावं लागलंय. सना ही पेशाने वकील आहे आणि तिचे नाव आर्यन खान-शीना बोरा सारख्या हायप्रोफाईल केसेसशी जोडले गेले होते. सना बिग बॉस 17 मधील सर्वात कमकुवत खेळाडू मानली जात होती. त्यामुळे जनतेने तिला बाहेरचा रस्ता दाखवला आहे. या आठवड्यात सना खानसह घरातील सदस्यांनी अनुराग डोवाल, अरुण श्रीकांत महाशेट्टी, विकी जैन, नील भट्ट, फिरोजा खान म्हणजेच खानझादी, मुनव्वर फारुकी आणि अभिषेक कुमार यांना घरातून बाहेर काढण्यासाठी नामांकित केले. या सर्व स्पर्धकांमध्ये अरुण महाशेट्टी आणि सना खान यांना सर्वात कमी मतं मिळाल्याने ते दोघे डेंजर झोनमध्ये होते. अखेरीस सलमान खानने जाहीर केले की, लोकांच्या कमी मतांमुळे सनाला बिग बॉसच्या घरातून जावं लागतंय. वकील असलेल्या सनाने बिग बॉसच्या घरात तिच्या डोक्याचा वापर केला आणि विवाहित असलेल्या विकी जैनशी मैत्री केली. या दोघांच्या मैत्रीची खुप चर्चा झाली. मात्र, गेल्या आठवड्यात विकी आणि सना यांच्यातील भांडणामुळे लोकांचा सनावरील विश्वास उडाला. आणि सनाला बिग बॉसमधून बाहेर जावं लागलंय.



# विद्युतने शेअर केले न्यूड फोटो!

बॉलिवूड अभिनेता विद्युत जामवाल हा आज त्याच्या 43 वा वाढदिवस साजरा करत आहे. 'बुलेट राजा', 'कमांडो', 'कमांडो 2' आणि 'कमांडो 3' यांसारख्या चित्रपटांमध्ये आपल्या जबरदस्त ॲक्शन आणि खतरनाक स्टंटमुळे विद्युतची मनोरंजन विश्वात वेगळीच ओळख आहे. त्याचा वाढदिवसामुळे चाहते त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत. या खास दिवशी त्याने सोशल मिडियावर पोस्ट शेयर करत खळबळ उडवली आहे. या खास दिवशी त्याने इंस्टाग्रामवर त्याचा न्यूड फोटो शेअर केला आहे. ही पोस्ट शेयर करत त्याने एक लांबलचक पोस्ट शेयर केली आहे. जी सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत. हॅंडसम हंक म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या विद्युत जामवालने त्याचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. फोटोंमध्ये विद्युत जंगलात दिसत आहे. एका फोटोमध्ये तो स्वयंपाक करताना दिसत आहे.

# 'दिल चाहता है' ला 23 वर्ष झाल्याने फरहानची पोस्ट

आमिर खान - अक्षय खन्ना - सैफ अली खान यांचा 'दिल चाहता है' सिनेमा सर्वांच्या लक्षात असेल. मैत्री - प्रेम आणि आयुष्य कसं जगायचं हे सांगणारा हा खास सिनेमा. दिल चाहता है सिनेमाने पुढे अनेक पिढ्यांना खास प्लॅन करुन गोव्याला जायला शिकवलं. दिल चाहता है सिनेमाला २३ वर्ष पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने दिल चाहता है चा दिग्दर्शक आणि अभिनेता फरहान अख्तरने खास पोस्ट लिहीली आहे. 'दिल चाहता है' सिनेमाला २३ वर्ष पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्ताने फरहान अख्तर 'दिल चाहता है' चा आयकॉनिक सीन्स जिथे शूट झाला त्या चापोरा किल्ल्यावर पुन्हा एकदा गेला. तिथे गेल्यावर फरहान अख्तरने लिहीले, "आकाश, सिड आणि समीर यांच्या जीवनाचं चित्रीकरण केल्यानंतर पहिल्यांदाच चापोरा किल्ल्यावर परतलो. हे सर्व 23 वर्षांपूर्वी घडलं होतं. बरेच काही बदलले आहे परंतु गोव्यातील उबदार आणि समुद्राची खारी हवा तशीच आहे. काही ठिकाणे फक्त जादुई असतात." २००१ साली आलेला दिल चाहता है आज एक आयकॉनिक सिनेमा म्हणून ओळखला जातो. सिनेमाला २३ वर्ष झाली असली तरीही आजच्या पिढीलाही हा सिनेमा जवळचा वाटतो. फरहान अख्तरचा दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट. या सिनेमात आमिर खान, अक्षय खन्ना आणि सैफ अली खान यांनी आकाश - समीर - सीड ही भूमिका साकारली होती. याशिवाय या सिनेमात डिंपल कपाडीया, प्रिती झिंटा आणि सोनाली कुलकर्णी यांच्याही भूमिका होत्या.

# वेस्ट इंडिज संघासाठी वाईट बातमी!

## निकोल्स पूरनसह 'या' तीन खेळाडूंनी नाकारला केंद्रीय करार

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्ड यूएसएसह संयुक्त यजमान म्हणून २०२४ टी-२० विश्वचषक स्पर्धेचे आयोजन करणार आहे. त्याचबरोबर विश्वचषकाच्या काही महिन्यांपूर्वी संघाला मोठा धक्का बसू शकतो. वास्तविक, संघातील तीन दिग्गज खेळाडूंनी केंद्रीय करार नाकारला आहे. केंद्रीय खेळाडूंचा क्रिकेट बोर्डाशी करार केला जातो. याअंतर्गत खेळाडूंना वार्षिक वेतन मिळते. यावरून असे दिसून येते की तुम्ही राष्ट्रीय संघाशी संबंधित आहात आणि प्रत्येक स्पर्धेसाठी करार असलेल्या खेळाडूंनाच निवडीत महत्त्व मिळते. पण आता या तीन दिग्गज खेळाडूंनी टी-२० विश्वचषकापूर्वी करार नाकारून कॅरेबियन चाहत्यांना धक्का दिला आहे.**



दोन वेळा टी-२० विश्वचषक जिंकणारा वेस्ट इंडिजचा संघ गेल्या काही वर्षांत विस्कळीत झाला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बोर्डाशी असलेले मतभेद आणि खेळाडूंचा टी-२० लीगकडे वाढता कल. त्यांना राष्ट्रीय संघातून खेळायचे नाही. कदाचित त्यामुळेच आता निकोलस पूरन, जेसन होल्डर आणि काइल मायर्स सारख्या बड्या खेळाडूंनी संघाचा केंद्रीय करार नाकारला आहे. होल्डर आणि पूरण हे देखील संघाचे माजी कर्णधार आहेत. पण आता हे खेळाडूही काही माजी खेळाडू किरॉन पोलार्ड, ड्वेन ब्राव्हो आणि सुनील नरेन यांच्या मार्गावर चालताना दिसत आहेत. मात्र, हे खेळाडू संघ निवडीसाठी उपस्थित राहणार असल्याचे आयसीसीकडून सांगण्यात आले आहे. या तिघांनीही संघासोबत आगामी सामन्यांमध्ये खेळण्यासाठी उपस्थितीबाबत स्पष्टता व्यक्त केली आहे. २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकातही तो संघाचा भाग होता. अशा परिस्थितीत पूरण, होल्डर आणि मायर्स यांचेही मरून आर्मीमध्ये पुनरागमन होण्याची शक्यता कायम आहे. पण त्याचा संपूर्ण निर्णय क्रिकेट वेस्ट इंडिजवर अवलंबून असेल. ॲलेक अथेनेस, क्रेग ब्रॅथवेट, केसी कार्टी, टेगनरैन चंद्रपॉल, जोशुआ डी सिल्वा, शाई होप, अकेल होसेन, अल्झारी जोसेफ, ब्रँडन किंग्स, गुडाकेश मोती, रोव्हमन पॉवेल, केमार रोच, जेडेन सील्स, रोमॅरियो शेफर्ड.वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्ड यूएसएसह संयुक्त यजमान म्हणून २०२४ टी-२० विश्वचषक स्पर्धेचे आयोजन करणार आहे.

### कोण आहेत ते तीन दिग्गज खेळाडू?

हे खेळाडू संघ निवडीसाठी उपस्थित राहणार असल्याचे आयसीसीकडून सांगण्यात आले आहे. या तिघांनीही संघासोबत आगामी सामन्यांमध्ये खेळण्यासाठी उपस्थितीबाबत स्पष्टता व्यक्त केली आहे. पण तिघांनीही करार नाकारल्याने ते टी-२० लीगवर अधिक लक्ष केंद्रित करणार असल्याचे स्पष्ट होते. पण तिघांनीही त्यांच्या उपलब्धतेवर दिलेल्या उत्तरामुळे चाहत्यांना काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो. कदाचित ते २०२४ च्या टी२० विश्वचषकात सहभागी होऊ शकतील. मात्र याबाबतचा अंतिम निर्णय बोर्ड घेईल, कारण करार असलेल्या खेळाडूंचा प्रथम विचार केला जातो. दोन वेळा टी-२० विश्वचषक जिंकणारा वेस्ट इंडिजचा संघ गेल्या काही वर्षांत विस्कळीत झाला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बोर्डाशी असलेले मतभेद आणि खेळाडूंचा टी-२० लीगकडे वाढता कल. त्यांना राष्ट्रीय संघातून खेळायचे नाही. कदाचित त्यामुळेच आता निकोलस पूरन, जेसन होल्डर आणि काइल मायर्स सारख्या बड्या खेळाडूंनी संघाचा केंद्रीय करार नाकारला आहे. होल्डर आणि पूरण हे देखील संघाचे माजी कर्णधार आहेत. पण आता हे खेळाडूही काही माजी खेळाडू किरॉन पोलार्ड, ड्वेन ब्राव्हो आणि सुनील नरेन यांच्या मार्गावर चालताना दिसत आहेत.


त्याचबरोबर विश्वचषकाच्या काही महिन्यांपूर्वी संघाला मोठा धक्का बसू शकतो. वास्तविक, संघातील तीन दिग्गज खेळाडूंनी केंद्रीय करार नाकारला आहे. केंद्रीय खेळाडूंचा क्रिकेट बोर्डाशी करार केला जातो. याअंतर्गत खेळाडूंना वार्षिक वेतन मिळते. यावरून असे दिसून येते की तुम्ही राष्ट्रीय संघाशी संबंधित आहात आणि प्रत्येक स्पर्धेसाठी करार असलेल्या खेळाडूंनाच निवडीत महत्त्व मिळते.

# भारत-दक्षिण आफ्रिकेतील पहिला सामना रद्द

## भारत-दक्षिण आफ्रिकेतील दुसरा सामना मंगळवारी

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना आज डर्बनमधील किंग्समीड येथे खेळवला जाणार होता. मात्र, पावसामुळे हा सामना सुरू होऊ शकला नाही. सततच्या पावसामुळे या सामन्याची नाणेफेकही होऊ शकली नाही. अशा परिस्थितीत हवामान आणि मैदानाची स्थिती लक्षात घेऊन पंचांनी सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला.**



भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला टी-२० सामन्याची नाणेफेक भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता होणार होती. त्यानंतर सामना साडेसात वाजता सुरू होणार होता. मात्र, बराच वेळ पाऊस पडत होता. त्यामुळे नाणेफेक वेळेवर होऊ शकली नाही. यानंतर पाऊस थांबण्याची खूप वेळ प्रतीक्षा पाहण्यात आली, मात्र पाऊस थांबला नाही. त्यामुळे पंचांनी सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला टी-२० सामना नाणेफेक न होता रद्द करण्यात आला. हा सामना पाहण्यासाठी हजारो चाहते स्टेडियममध्ये आले होते. या सामन्याची सर्व तिकिटे विकली गेली होती. मात्र, आता चाहत्यांना निराश होऊन घरी परतावे लागले. सामन्याशी संबंधित अधिकाऱ्यांनी बराच वेळ पाऊस थांबण्याची वाट पाहिली असली, तरी तब्बल अडीच तास प्रतीक्षा केल्यानंतर सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता उभय संघांमधला दुसरा सामना १२ डिसेंबरला गेबेरहा येथे होणार आहे. तिसरा आणि शेवटचा सामना १४ डिसेंबर रोजी जोहान्सबर्ग येथे होणार आहे. आयसीसी टी-२० विश्वचषका २०२४ यावेळी परदेशी भूमीवर खेळवला जाईल. या विश्वचषकापूर्वी भारताला फक्त ५ टी-२० सामने खेळण्याची संधी मिळणार आहे. यापैकी भारतीय संघ अफगाणिस्तानसोबत मायदेशात तीन सामने खेळणार आहे. संघ जानेवारी २०२४ मध्ये

### प्रेक्षक निराश होऊन परतले

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला टी-२० सामना नाणेफेक न होता रद्द करण्यात आला. हा सामना पाहण्यासाठी हजारो चाहते स्टेडियममध्ये आले होते. या सामन्याची सर्व तिकिटे विकली गेली होती. मात्र, आता चाहत्यांना निराश होऊन घरी परतावे लागले. सामन्याशी संबंधित अधिकाऱ्यांनी बराच वेळ पाऊस थांबण्याची वाट पाहिली असली, तरी तब्बल अडीच तास प्रतीक्षा केल्यानंतर सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता उभय संघांमधला दुसरा सामना १२ डिसेंबरला गेबेरहा येथे होणार आहे. तिसरा आणि शेवटचा सामना १४ डिसेंबर रोजी जोहान्सबर्ग येथे होणार आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला टी-२० सामन्याची नाणेफेक भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता होणार होती. त्यानंतर सामना साडेसात वाजता सुरू होणार होता. मात्र, बराच वेळ पाऊस पडत होता. त्यामुळे नाणेफेक वेळेवर होऊ शकली नाही. यानंतर पाऊस थांबण्याची खूप वेळ प्रतीक्षा पाहण्यात आली, मात्र पाऊस थांबला नाही. त्यामुळे पंचांनी सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला.

भारत दौऱ्यावर येणार आहे. जिथे उभय संघांमध्ये तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. दुसरीकडे, बीसीसीआयलाही शर्मापासून विराट कोहली आणि केएल राहुलपर्यंत संघातील वरिष्ठ खेळाडूंनी एकही टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. रोहित शर्मा आणि विराट कोहली २०२४च्या टी-२० विश्वचषकात खेळणार की नाही हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.